आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२० एप्रिल २०२४ - शनिवार

पहिल्या टप्प्यात काल महाराष्ट्रातल्या भंडारा गोंदिया, चंद्रपूर, **गडचिरोली-चिमूर, नागपूर आणि रामटेक** या पाच मतदारसंघांसाठी अंदाजे सरासरी ६१ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान झालं. गडचिरोली-चिमूर मतदार संघात सर्वाधिक ७० पूर्णांक ३८ टक्के मतदानाची नोंद झाली, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं. या सर्वच मतदारसंघांमध्ये २०१९च्या तुलनेत मतदानात घसरण झाल्याचं दिसलं. २०१९ मध्ये गडचिरोली-चिमूर मतदार संघात ७२ पूर्णांक ३३ टक्के, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं होतं.

**भंडारा - गोंदिया** मतदार संघात यंदा ६४ पूर्णांक ७२ टक्के, चंद्रपूरमध्ये ६३ पूर्णांक ७ शतांश टक्के, तर रामटेक मतदारसंघात ५९ पूर्णांक ५८ टक्के मतदानाची नोंद झाली.

या टप्प्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह एकूण ९७ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी राज्यात काल उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३६१ उमेदवारांचे ५२२ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या सर्व अर्जांची आज छाननी होईल, तर अर्ज मागे घेण्यासाठी उद्या शेवटचा दिवस असेल. तिसऱ्या टप्प्यात राज्यात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदूर्ग, कोल्हापूर, हातकणंगले या अकरा मतदारसंघासाठी ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे.

**<><><><>**

भारतातल्या मजबूत लोकशाहीकडे संपूर्ण जगाचे लक्ष असून लोकशाहीत मतदान ही सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे देशात होत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वांनी मतदान करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नांदेड इथं निवडणूक प्रचारसभेत बोलत होते. पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. काँग्रेसने आपल्या कार्यकाळात दलित, गरीब यांच्याकडे दुर्लक्षच केल्याचा आरोप त्यांनी केला. येत्या पाच वर्षांत देशात विकास घडवून आणण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला.

यानंतर त्यांनी परभणी इथंही प्रचारसभा घेतली. गेल्या दशकात झालेल्या समावेशक विकासानुसार ‘सबका साथ सबका विकास’ सार्थ ठरवण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

सर्वसामान्यांच्या हितासाठी महाविकास आघाडीला मत द्यावं, असं आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज केलं. पवार यांनी आज महाविकास आघाडीचे छत्रपती संभाजी नगरचे उमेदवार चंद्रकांत खैरे आणि जालना मतदारसंघातील उमेदवार डॉक्टर कल्याण काळे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली त्यावेळी ते बोलत होते. सद्यस्थितीत सर्वत्रच बेरोजगारी वाढली आहे, शेतकरी दुष्काळाचा सामना करत आहेत, पेट्रोल, गॅसच्या किंमती वाढल्या आहेत याचा विचार करून मत द्यावं असं ते म्हणाले.

**<><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामतीत सुनेत्रा पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. ही निवडणूक सुनेची आणि मुलीची नाही तेव्हा मतदारांनी भावनिक होऊ नये असं आवाहन त्यांनी केलं. मित्र पक्षाला महत्त्व द्यायला कमीपणा वाटू देऊ नका, असंही त्यांनी सांगितलं. सर्व संस्था शरद पवार यांनी काढल्या, मग आम्ही ३०-३५ वर्षे काय करत होतो, असा प्रश्न देखील पवार त्यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

देशात इंडिया आघाडीला तीनशेहून अधिक जागांवर विजय मिळणार असल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी आज सांगलीत प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. पक्षांतर्गत वादामुळे शरद पवार यांच्यासारखा कर्तृत्ववान नेत्याला प्रधानमंत्री पदाची संधी मिळाली नाही, मात्र जी संधी त्यांना मिळाली नाही ती उद्धव ठाकरेंना मिळाली तर स्वागतच करायला हवं, असं ते म्हणाले.

**<><><><>**

बहुजन वंचित आघाडीचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार वसंतराव मगर यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे बहुजन वंचित आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर यांची सभा झाली. वंचितच्या उमेदवाराला विजयी करण्याचं आवाहन करताना त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणावर टीका केली.

**<><><><>**

आपण लाेकसभा निवडणूक लढवणार नसल्याचं शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ ज्योती मेटे यांनी स्पष्ट केलं आहे. त्या आज बीड बातमीदारांशी बोलत होत्या. मात्र आपण शिवसंग्रामची भूमिका ठरवणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

जनतेचा स्वाभिमान जपावा म्हणून लोकसभा लढवावी अशी मागणी होती, त्यामुळेच आपण शासकीय नोकरीतून सेवानिवृत्ती घेतली होती असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत.

**<><><><><>**

मुंबईत गोरेगावमधल्या पी दक्षिण वॉर्डात वीरवानी इंडस्ट्रीयल इस्टेट इथं भागात जलवाहिन्या बदलण्याचं काम हाती घेतल्यानं २३ ते २४ एप्रिलला पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याचं महानगरपालिकेनं कळवलं आहे. २३ एप्रिलला सकाळी १० वाजल्यापासून ते २४ एप्रिलला सकाळी १० वाजेपर्यंत पी दक्षिण, पी पूर्व आणि आर दक्षिण वार्डांचा पाणीपुरवठा बंद राहील असं पालिकेनं कळवलं आहे.

**//<><><><><>//**